प्रेसनोट

दिनांक. १८/१०/२०२२

लोकसेवक ज्ञानेश्वर रघुनाथ वट्टमवार, वय वर्षे, उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं., वाडा, जि. पालघर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी घेतले ताब्यात.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | वाडा पोलीस ठाणे, जिल्हा पालघर. |
| ३ | कलम | भ्र.प्र. अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक ज्ञानेश्वर रघुनाथ वट्टमवार, वय वर्षे, उप कार्यकारी अभियंता, म.रा. वि.वि.कं., वाडा, जि.पालघर. |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ३,००,०००/– रूपये. तडजोडीअंती १,००,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | १,००,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांची भागीदारीमध्ये ईलेक्ट्रीक कॉन्ट्रॅक्ट चा व्यवसाय असून तक्रारदार यांच्या कंपनीस कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं., वसई यांचेकडून मिळालेल्या कामाअंतर्गत तक्रारदार यांच्या कंपनीने नवीन लाईटचे पोल उभारणे, १०० के.व्ही.ए. चा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविणे, एच.टी. व एल.टी. लाईन उभारून लाईन चालू करणे, लाईटचे जुने पोल व कंडक्टर बदलून व रिपेरिंगचे काम करणे ईत्यादी कामे डिसेंबर २०२१ मध्ये पुर्ण केलेली आहेत.<br>त्यानंतर तक्रारदार यांनी सदरच्या कामांचे एकुण ९२,४१,०००/– रू चे बिल उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं., वाडा यांचेकडे सादर केले असता, लोकसेवक ज्ञानेश्वर वट्टमवार यांनी तक्रारदार यांचे सदरचे बिल मंजूरीच्या अनुषंगाने सर्व कार्यवाही पुर्ण करून ते मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.लि.,वसई यांचेकडे सादर करण्यासाठी १,००,०००/– रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दिनांक १८/१०/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि. १८/१०/२०२२ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांच्या कामासाठी आरोपी लोकसेवक यांनी १,००,०००/– रू लाचेची मागणी करून सदरची लाचेची रक्कम १८/१०/२०२२ रोजी दुपारी १९:०२ वाजताच्या सुमारास उप कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं., वाडा कार्यालयात स्विकारली असता, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– ––

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं. :– 1064

दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297

व्हॉट्स ॲप क्र. :– 9923346810

(नवनाथ जगताप)

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर